जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २२९ | रविवार, १५ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER


# विश्वराज हॉस्पिटलचा अडेलतट्टू कारभार?

## पैशांसाठी १२ तास आधीच रुग्णाचे उपचार बंद केल्याचा नातेवाईकांचा आरोप

**लोणी काळभोर, ता. १३ :** पैसे आधी की रुग्णाचा जीव आधी? असा संतप्त सवाल निर्माण करणारी धक्कादायक घटना लोणी काळभोर (ता. हवेली) येथे उघडकीस आली आहे. पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात गंभीर जखमी झालेल्या तरुणावर लोणी काळभोर येथील विश्वराज हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. मात्र, डिस्चार्जची रक्कम भरली नाही या कारणावरून रुग्णालय प्रशासनाने तब्बल १२ तास उपचार बंद ठेवले, असा आरोप रुग्णाच्या नातेवाईकांनी केला आहे.

दरम्यान, या घटनेमुळे रुग्णालय प्रशासनाचा हलगर्जीपणा उघडकीस आला असून रुग्णाच्या जीवाशी खेळ सुरू आहे का? असा सवाल नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून उपस्थित केला जात आहे. धर्मादाय आयुक्तांच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या रुग्णालयात असा गंभीर प्रकार घडल्याने आरोग्य व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.




सोरतापवाडी (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीत बुधवारी (ता. ११ मार्च) भीषण अपघात झाला होता. या अपघातात अनुराग योगेश चिकणे (रा. भोसरे, ता. माढा) हा तरुण गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने लोणी काळभोर येथील विश्वराज हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. अपघातात त्याचा डावा हात अक्षरशः चेंदामेंदा झाला होता. डॉक्टरांनी तातडीची शस्त्रक्रिया करून हात कापण्याचा निर्णय घेतला आणि शस्त्रक्रिया करण्यात आली.

रुग्णाच्या नातेवाईकांनी सुरुवातीला ३० ते ३५ हजार रुपये रुग्णालयात भरले. काही उपचार मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून सुरू करणार असल्याचे सांगितले होते. परंतु, नंतर या योजनेतून उपचार होणार नसल्याचे रुग्णालय प्रशासनाने सांगितले. त्यानंतर रुग्णालय प्रशासनाने आणखी पैशांची मागणीचा तगादा लावल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. रुग्णाच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने त्यांनी रुग्णालय प्रशासनाला आमच्याकडे पैसे नाहीत, रुग्णाला डिस्चार्ज द्या अशी विनंती केली. परंतु, प्रशासनाने ५० हजार रुपये भरल्याशिवाय रुग्णाला घेऊन जाता येणार नाही असा पवित्रा घेतल्याचे सांगितले जाते.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे शुक्रवारी (ता. १३) सकाळी सुमारे ११ वाजल्यापासून रुग्णाचे उपचार थांबवण्यात आल्याचा आरोप आहे. अनुरागचे वडील योगेश चिकणे यांनी डॉक्टरांसमोर हात जोडून उपचार बंद करू नका, मी पैसे भरतो अशी विनवणी केली. मात्र, त्यांची विनंतीही हॉस्पिटल प्रशासनाने धुडकावून लावल्याचे सांगितले जाते.

योगेश चिकणे यांनी रात्री सुमारे नऊ वाजता नातेवाईकांकडून हातउसने पैसे घेऊन रुग्णालयात भरले. त्यावेळी रुग्णालय प्रशासनाने आणखी १० हजार रुपयांची मागणी केल्याचा आरोप आहे. त्यानंतर एका पत्रकाराने हस्तक्षेप केल्यानंतर रुग्णालय प्रशासनाने अखेर रात्री साडेअकराच्या सुमारास अनुरागला डिस्चार्ज दिला. त्यामुळे विश्वराज हॉस्पिटलचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

दरम्यान, या प्रकारामुळे परिसरात संताप व्यक्त केला जात असून जर या तरुणाच्या जीवाचे काही बरे-वाईट झाले असते तर जबाबदार कोण? असा सवाल उपस्थित केला जात आहे. पैशांसाठी रुग्णालय प्रशासन रुग्णाच्या जीवाशी खेळ करत आहे का, अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिकांकडून उमटत आहे. धर्मादाय रुग्णालय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संस्थेत अशी घटना घडत असेल तर हा प्रकार माणुसकीला काळीमा फासणारा असल्याची भावना व्यक्त होत आहे. या घटनेची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

> अनुराग चिकणे याला रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्याच्यावर तातडीने शस्त्रक्रिया करण्यात आली. त्याला कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळू शकला नाही. त्यामुळे त्याचे रुग्णालयातील एकूण बिल सुमारे अडीच लाख रुपयांपर्यंत गेले होते. बिलाची रक्कम जास्त होत असल्याने नातेवाईकांनी पुढील उपचारांसाठी दुसऱ्या रुग्णालयात हलवण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानुसार आम्ही केवळ ५० हजार रुपये घेऊन रुग्णाला डिस्चार्ज दिला आहे. सकाळी रुग्णाला औषधांचा डोस देण्यात आला होता; मात्र डिस्चार्ज कार्डची समरी तयार झाल्यानंतर कोणताही पुढील उपचार करण्यात आलेला नाही.
> - **शंभूदेव फड,** (व्यवस्थापक, वैद्यकीय कामकाज, विश्वराज हॉस्पिटल)

> तुम्ही माझा जीव जरी घेतला तरी माझ्याकडे आता पैसे नाहीत. मी तुमचा एक रुपयाही बुडवणार नाही. शासकीय योजनेतून उपचार करा. कृपया उपचार थांबवू नका, अशी हात जोडून व पाया पडून विनंती केली. मात्र, तरीही रुग्णालय प्रशासनाने तब्बल १२ तास माझ्या मुलाला एक गोळीही दिली नाही. हॉस्पिटलला रुग्णाच्या जीवाशी काही देणेघेणे नसून त्यांना फक्त पैशांचीच चिंता आहे. रुग्णालय प्रशासनाकडून रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू असून आम्हाला प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागला.
> - **योगेश चिकणे,** (अनुरागचे वडील)

## संक्षिप्त

### विश्रांतवाडीत वादातून सोसायटीतील वाहने पेटवून देणारा गजाआड

**पुणे, ता. १४ :** वादातून सोसायटीतील वाहने पेटवून देणाऱ्या एकाला विश्रांतवाडी पोलिसांनी अटक केली. धानोरीतील एका सोसायटीच्या आवारात ही घटना घडली. विशाल राजेश खलसे (वय-१९, रा. परांडेनगर, धानोरी ) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत एकाने विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विश्रांतवाडीतील धानोरी रस्त्यावर प्रियांश अपार्टमेंट आहे. तक्रारदार तरुणाची आरोपी खलसे याच्याशी भांडणे झाली होती. त्यानंतर खलसे हा प्रियांश अपार्टमेंटच्या आवारात मार्च रोजी पहाटे चारच्या सुमारास आला. त्याने सोसायटीतील तळमजल्यावर लावलेल्या वाहनांना आग लावली. आगीत सहा वाहनांचे नुकसान झाले, तसेच सोसायटीतील तळमजल्यावर असलेल्या वीज वाहिनीला आगीची झळ पोहोचली. सोसायटीच्या आवारातील वस्तू आगीत जळाल्या. आगीच्या घटनेची रहिवाशांनी अग्निशमन दलाला माहिती दिली. जवानांनी पाण्याचा मारा करुन आग आटोक्यात आणली.

# लोणी काळभोर येथे दावत-ए-इफ्तारमधून झळकले हिंद-मुस्लीम ऐक्य

**लोणी काळभोर, ता. १४ :** सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचा संदेश देणारे सुंदर चित्र लोणी काळभोर येथे पाहायला मिळाले. पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने ह. बागूलशहा वली दर्गा ट्रस्ट आणि शेर-ए-हिंद फ्रेंड सर्कल यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दावत-ए-इफ्तार कार्यक्रमात हिंदू आणि मुस्लीम बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले. या कार्यक्रमातून लोणी काळभोरमध्ये पुन्हा एकदा हिंदू-मुस्लीम ऐक्याचे दर्शन घडले.




इफ्तारच्या या कार्यक्रमात विविध समाजघटकांतील मान्यवरांनी एकत्र येत बंधुभाव, एकोपा आणि सामाजिक सलोखा टिकवण्याचा संदेश दिला. रमजान महिन्यातील उपवास सोडण्याच्या या पवित्र क्षणी सर्वांनी एकत्र येऊन इफ्तार घेतला आणि परस्परांना शुभेच्छा दिल्या. त्यामुळे परिसरात एकात्मता आणि सौहार्दाचे वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमाला प्रिंट व डिजिटल पत्रकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष बापूसाहेब उर्फ राजेंद्र काळभोर, हवेली कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती सनी उर्फ युगंधर काळभोर, लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक योगेश पैठणे, पोलीस हवालदार रवी आहेर, संदीप जोगदंड, बापू वाघमोडे, आलमगीर जामा मशिदीचे अध्यक्ष फयाजभाई इनामदार, रशीद इनामदार, नईम इनामदार, समीर इनामदार, बाबूलाल इनामदार, अब्दुलभाई अक्कलकोटकर, अप्पासाहेब काळभोर, ॲड. सुजित कांबळे यांच्यासह हिंदू आणि मुस्लीम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, या दावत-ए-इफ्तार कार्यक्रमामुळे लोणी काळभोर परिसरात सामाजिक ऐक्य आणि सौहार्दाचे वातावरण निर्माण झाले असून धर्म वेगळे असले तरी माणुसकी एकच असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. विविध समाजघटकांतील नागरिकांनी एकत्र येऊन परस्परांतील प्रेम, विश्वास आणि बंधुभाव अधिक दृढ करण्याचे काम या कार्यक्रमातून झाले, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे आयोजन ह. बागूलशहा वली दर्गा ट्रस्ट आणि शेर-ए-हिंद फ्रेंड सर्कल यांच्या वतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रियाज शेख, शफी आतार, निजाम तांबोळी, शाहीर शेख, फिरोज तांबोळी, रिझवान तांबोळी, जुबेर तांबोळी, अलीम शेख, अखलाख शेख, फैज शेख, युनुस चौधरी, अरबाज मन्यार आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# लोणी काळभोरमध्ये विकासकामांना गती पेव्हिंग ब्लॉक व रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन

**लोणी काळभोर, ता. १४ :** लोणी काळभोर (ता. हवेली) परिसरातील मूलभूत सुविधांच्या विकासासाठी आणखी एक पाऊल टाकत अंबरनाथ मंदिर परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसविणे तसेच राहिंज वस्ती येथे रस्त्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. या विकास कामांमुळे गावाला गती मिळणार आहे.

या विकासकामांचा भूमिपूजन सोहळा शुक्रवारी (ता.१३) मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी जिल्हा परिषद सदस्या शितल सुजित कांबळे व पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य संजय गायकवाड, लोणी काळभोरचे माजी सरपंच शरद काळभोर, भोलेनाथ शेलार, प्रशासक सरपंच नागेश काळभोर, राजाराम काळभोर, राहुल काळभोर आदी मान्यवर उपस्थित होते.



अंबरनाथ मंदिर परिसरात नागरिकांच्या सोयीसाठी पेव्हिंग ब्लॉक बसविण्याचे काम हाती घेण्यात आले असून यामुळे परिसरातील रस्ते अधिक सुस्थितीत होणार आहेत. तसेच राहिंज वस्ती येथे दत्ता शेंडगे यांच्या घरापासून महादेव कुंभार यांच्या घरापर्यंत नवीन रस्ता तयार करण्यात येणार आहे. या कामामुळे स्थानिक नागरिकांची दीर्घकाळची मागणी पूर्ण होणार असून परिसरातील वाहतूक व दैनंदिन ये-जा सुलभ होणार आहे. यावेळी बोलताना शितल कांबळे म्हणाल्या की, गावाच्या सर्वांगीण विकासासाठी अशा कामांना प्राधान्य दिले जाईल. गावातील रस्ते, पाणी, स्वच्छता आणि इतर मूलभूत सुविधांबाबत टप्प्याटप्प्याने कामे हाती घेऊन नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी लोणी काळभोरचे माजीसरपंच आण्णासाहेब काळभोर, राजेंद्र काळभोर, ज्ञानेश्वर काळभोर, हेमंत गायकवाड, बाळासाहेब काळभोर, पांडुरंग केसकर, गुरुदेव काळभोर, अमोल कोळपे, सुभाष काळभोर, रमेश भोसले, युवराज काळभोर, ग्रामपंचायत अधिकारी सतीश गवारी, अजय काळभोर, नितीन जगताप, सतीश काळभोर, विश्वनाथ रुपनर, नेता केसकर, गोरख मोरे आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा वादात; स्थगितीसाठी विरोधी संघटनेची न्यायालयात याचिका

**वाघोली, ता. १४ :** पुण्यातील वाघोली येथे १८ ते २२ मार्च दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेवर कायदेशीर वादाचे सावट निर्माण झाले आहे. या स्पर्धेला स्थगिती द्यावी, या मागणीसाठी पुणे जिल्हा न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्याने कुस्ती विश्वात मोठी खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र कुस्ती महासंघाचे अध्यक्ष रामदास तडस यांच्या पुढाकाराने वाघोली येथे महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. १८ मार्च ते २२ मार्च या कालावधीत ही स्पर्धा होणार असल्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र या स्पर्धेच्या आयोजनावर महाराष्ट्र भारतीय शैली कुस्ती संघटनेने आक्षेप नोंदवला आहे. या संघटनेच्या म्हणण्यानुसार, महाराष्ट्र केसरी हे नाव वर्षानुवर्षे त्यांच्या संघटनेमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या स्पर्धेसाठी वापरले जात आहे. त्यामुळे या नावाने दुसरी स्पर्धा आयोजित करणे योग्य नसून यामुळे खेळाडू, आयोजक आणि कुस्तीप्रेमींमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो, असा दावा याचिकेत करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित स्पर्धेला तात्पुरती स्थगिती द्यावी, अशी मागणी करत पुणे जिल्हा न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेमुळे वाघोलीत होणाऱ्या स्पर्धेबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. दरम्यान, या प्रकरणावर सोमवारी (ता. १६) न्यायालयात सुनावणी होण्याची शक्यता असून न्यायालयाचा निर्णय काय येतो याकडे आता कुस्ती क्षेत्राचे लक्ष लागले आहे. जर न्यायालयाने स्थगिती दिली, तर वाघोलीत होणाऱ्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

महाराष्ट्रातील कुस्तीप्रेमींसाठी अत्यंत प्रतिष्ठेची मानली जाणारी महाराष्ट्र केसरी स्पर्धा वादाच्या भोवऱ्यात सापडल्याने क्रीडाविश्वात चर्चा रंगली आहे. न्यायालयाच्या निर्णयानंतर या स्पर्धेचे भवितव्य निश्चित होणार असल्याने कुस्तीपटू आणि आयोजकांमध्येही उत्सुकता निर्माण झाली आहे.

# लोणी काळभोरची गोल्डन गर्लप्रिशा बोनुटे; आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाडमध्ये जगात पहिली

**लोणी काळभोर, ता. १४ :** लोणी काळभोर (ता. हवेली) येथील द टायग्रिष स्कूलच्या इयत्ता पहिलीतील विद्यार्थिनी प्रिशा बोनुटे हिने आंतरराष्ट्रीय संगणक विज्ञान ऑलिंपियाड या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवत दैदिप्यमान यश संपादन केले आहे. अत्यंत कमी वयात मिळवलेले हे यश शाळेसह संपूर्ण परिसरासाठी अभिमानास्पद मानले जात आहे.

प्रिशाने या स्पर्धेत १०० टक्के गुण मिळवत तब्बल ९९.६३ टक्के परसेंटाईल मिळवला. तिच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे तिने शाळा स्तर, झोनल स्तर, प्रादेशिक स्तर आणि आंतरराष्ट्रीय स्तर अशा सर्व टप्प्यांमध्ये अव्वल स्थान पटकावत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. संगणक विज्ञान विषयातील तिची अचूक समज, वेगवान विचारशक्ती आणि तर्कशुद्ध उत्तरांमुळे तिने ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली.



या भव्य यशाबद्दल प्रिशाला इंटरनॅशनल गोल्ड मेडल, गोल्ड मेडल ऑफ डिस्टिंक्शन, सर्टिफिकेट ऑफ आऊटस्टँडिंग परफॉर्मन्स, सर्टिफिकेट ऑफ डिस्टिंक्शन तसेच १ हजार किमतीच्या भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले आहे. एवढ्या लहान वयात आंतरराष्ट्रीय स्तरावर झेंडा फडकवणाऱ्या प्रिशाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. प्रिशाच्या या यशाबद्दल द टायग्रिष स्कूलचे व्यवस्थापन, शिक्षकवृंद आणि तिच्या पालकांनी आनंद व्यक्त करत तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, तर्कशक्ती, विश्लेषण क्षमता आणि स्पर्धात्मक वृत्ती विकसित करण्यासाठी शाळेत विविध शैक्षणिक उपक्रम, ऑलिम्पियाड प्रशिक्षण आणि आधुनिक शिक्षणपद्धतीचा वापर केला जातो. याच सकारात्मक वातावरणाचा परिणाम म्हणून शाळेतील विद्यार्थी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सातत्याने उल्लेखनीय यश संपादन करत असल्याचे शाळेच्या वतीने सांगण्यात आले.

प्रिशाच्या या उज्ज्वल यशामुळे लोणी काळभोर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शैक्षणिक क्षेत्रात द टायग्रिष स्कूलचे नाव पुन्हा एकदा अभिमानाने उज्ज्वल झाले आहे. परिसरातील नागरिक, पालकवर्ग आणि शिक्षणप्रेमींनी प्रिशाचे अभिनंदन करत तिच्या भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. दरम्यान, अत्यंत लहान वयात मिळवलेले हे आंतरराष्ट्रीय यश इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरत असून मेहनत, जिज्ञासा आणि योग्य मार्गदर्शन असेल तर कोणतीही उंची गाठता येते, हे प्रिशाने आपल्या कामगिरीतून सिद्ध करून दाखवले आहे.

पुणे प्राईम न्यूज

http://www.puneprimenews.com

## संक्षिप्त

### अमेरिकेकडून मोज्तबा खामेनींवर एक कोटी डॉलरचं बक्षीस

**नवी दिल्ली, ता. १४ :** आयातुल्ला अली खामेनेई यांच्या निधनानंतर इराणचे सर्वोच्च नेते म्हणून आयातुल्ला अली खामेनेई यांचा मुलगा मोजतबा खामेनेई याच्या नावाची घोषणा करण्यात आली. मोजतबा खामेनेई यांच्या नावाची घोषणा करण्यात आल्यानंतर इराण अधिक घातक बनला आणि थेट इस्त्रायलवर मोठे क्षेपणास्त्र टाकली. मात्र, मोजतबा खोमनी जास्त काळ जिवंत राहणार नसल्याचे थेट धमकीच अमेरिकेने दिली. तसेच मोजतबा खामेनेई जखमी झाल्याचे सांगितले जाते. याचरम्यान, अमेरिकेने अत्यंत मोठी घोषणा केली असून थेट मोजतबा खामेनेई यांच्यावर कोटी डॉलर्सचे बक्षिस जाहीर केले. मोजतबा खामेनेई यांच्याबद्दल माहिती देणाऱ्या आणि यासोबतच्या इराणच्या १० नेत्यांबद्दल माहिती देणाऱ्या अमेरिकेकडून कोटी डॉलर्सचे बक्षिस दिले जाणार आहे.

### तळेगाव दाभाडे येथे नोकरीच्या आमिषाने एकाची फसवणूक

**पिंपरी, ता. १४ :** पोलीस महासंचालकांशी ओळख असल्याची बतावणी करून मुलाला पोलीस दलात नोकरीला लावतो असे आमिष दाखवून एका व्यक्तीची सहा लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना जुलै २०२४ ते शुक्रवार (ता. १३) या कालावधीत तळेगाव दाभाडे येथे घडली. या प्रकरणी ५८ वर्षीय व्यक्तीने तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी आपली ओळख पोलीस महासंचालकांशी असल्याचे सांगून फिर्यादीच्या मुलाला नोकरी लावण्याचे आमिष दाखवले. गुगल पे द्वारे टप्प्याटप्प्याने सहा लाख रुपये घेऊन फसवणूक केली. पैसे परत मागितले असता आरोपींनी फिर्यादीला खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची आणि वाईट परिणामांची धमकी दिली.

### वाकडमध्ये हप्ता वसुलीवरून रिकव्हरी एजंटची तरुणाला मारहाण

**वाकड, ता. १४ :** कर्जाचे हप्ते थकल्याच्या कारणावरून एका रिकव्हरी एजंटने तरुणाला लाथाबुक्यांनी आणि हातातील कड्याने मारहाण करून जखमी केल्याची घटना घडली आहे. ही घटना गुरुवारी डांगे चौक, वाकड येथे घडली. या प्रकरणी २५ वर्षीय तरुणाने वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार रिकव्हरी एजंटवर गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि त्यांचा मित्र गप्पा मारत उभे असताना आरोपी तिथे आला आणि त्याने लोनचे हप्ते का भरत नाहीस असे म्हणून शिवीगाळ सुरू केली. आरोपीने त्याच्या हातातील कड्याने फिर्यादीच्या डोक्यात मारून दुखापत केली आणि जिवे मारण्याची धमकी दिली.

### चाकणमध्ये जुगारावर छापा; तिघांविरुद्ध कारवाई

**चाकण, ता. १४ :** चाकण येथील तळेगाव चौकातील एका पत्रा शेडमध्ये सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकला आहे. ही कारवाई शुक्रवारी करण्यात आली. या प्रकरणी पोलीस शिपाई सुनील गोविंद भागवत यांनी चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एक आरोपी हा इतर दोघांकडून पैसे घेऊन जुगार खेळवत असताना रंगेहात मिळून आला. पोलिसांनी घटनास्थळावरून २ हजार ८५० रुपयांचे जुगाराचे साहित्य आणि रोख रक्कम जप्त केली आहे.

# कदमवाकवस्ती येथील मैफिल पान शॉपवर पोलिसांचा छापा

## दोघांना अटक तर सुमारे २ लाखांचा अंमली पदार्थ जप्त ; तरुण पिढी नशेली पानाच्या विळख्यात?

**लोणी काळभोर, ता. १३ :** कदमवाकवस्ती (ता. हवेली) परिसरात खुलेआम विकल्या जाणाऱ्या नशेली पानाच्या व्यवसायावर अखेर पोलिसांनी मोठी कारवाई करत पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे. अंमली विरोधी पथक क्र. दोनने शुक्रवारी (ता. १३) सायंकाळी पाचच्या सुमारास कदमवाकवस्ती येथील मैफिल पान शॉपवर अचानक छापा टाकत दोन जणांना अटक केली. या कारवाईत २६६.४ ग्रॅम अंमली पदार्थ मिश्रित पान, मोबाईल फोन आणि इतर साहित्य असा सुमारे १ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणात दुकान मालक निशांत दत्तात्रय काळभोर (वय १९, रा. बाजारमळा, लोणी काळभोर) आणि कामगार रामजी संतोष पटेल (वय ३३, कामगार, सध्या रा. कदमवाकवस्ती, मूळ रा. जि. बांदा, उत्तर प्रदेश) यांना अटक करण्यात आली आहे. तर या प्रकरणातील रोहित जवळकर (रा. लोणी काळभोर) हा आरोपी सध्या फरार असून त्याचा शोध सुरू आहे. आरोपींविरोधात लोणी काळभोर पोलीस ठाण्यात अंमली पदार्थ व सायकोट्रॉपिक पदार्थ कायदा कलम ८ (c), १७ (b), २२ (b) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अंमली विरोधी पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन आणि मोबाईल ड्रग टेस्टिंग मशीनच्या सहाय्याने तपास केला असता खाण्याच्या पानामध्ये ॲम्फेटामाइन, बेंझोडायझेपाइन्स,




ओपिएट्स आणि मेथाम्फेटामाइन या धोकादायक अंमली पदार्थांचे मिश्रण करून नशेली पाने विकली जात असल्याचे उघड झाले. या उघडकीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या कारवाईनंतर परिसरातील अनेक पान टपऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अनेक विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत. मात्र नागरिकांच्या मते, ही कारवाई खूप उशिरा झाली आहे.

पूर्व हवेली परिसरात सुमारे २०० हून अधिक ठिकाणी नशा देणारी पाने विकली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. ही दुकाने पुणे-सोलापूर महामार्गालगत, चौकाचौकात तसेच हॉस्टेल, कॉलेज आणि शैक्षणिक संस्थांच्या परिसरात बिनधास्त सुरू असल्याचे चित्र आहे. त्यामुळे शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या प्रमाणात या पानाच्या आहारी जात असल्याची गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे.

या नशेली पानाची किंमत साधारण ३५ रुपये असून ते खाल्ल्यानंतर दारूच्या बाटलीइतकी नशा होत असल्याचा दावा स्थानिकांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे या पानाला दारू किंवा गुटख्यासारखा वास नसल्यामुळे पालकांना मुलांनी नशा केल्याचे लगेच लक्षात येत नाही.

> कदमवाकवस्तीतील मैफिल पान हाऊसवर छापा टाकून दुकानातील अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. अशा प्रकारच्या अंमली पदार्थांच्या विक्रीविरोधात कठोर कारवाई सुरूच राहणार असून येथून पुढेही ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार आहे.
> - **पंडित रेजीतवाड,** (पोलीस निरीक्षक- अंमली विरोधी पथक क्र. २)


त्यामुळे अनेक कुटुंबांमध्ये नकळत तरुण पिढी व्यसनाच्या दलदलीत अडकत असल्याचे चित्र समोर येत आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी राज्यसभा आणि विधानसभेतही नशेली पानाचा मुद्दा गाजला होता, तरीही स्थानिक प्रशासन आणि अन्न व औषध प्रशासन विभागाने ठोस मोहीम राबवली नाही, असा आरोप नागरिकांकडून होत आहे. परिणामी आज हा व्यवसाय अनेक ठिकाणी वाढला असून तरुण पिढीला व्यसनाच्या गर्तेत ढकलणारा हा धोकादायक प्रकार प्रशासनाच्या नजरेआड कसा राहिला? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

या पानामुळे विद्यार्थ्यांमध्ये भांडणे, आरोग्याच्या समस्या आणि असामाजिक वर्तन वाढत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. त्यामुळे केवळ एका दुकानावर कारवाई करून प्रश्न सुटणार नाही, तर पूर्व हवेलीतील सर्व नशेली पान विक्री केंद्रांवर व्यापक मोहीम राबवून कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

## यवत पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरट्यांचा धुमाकूळ सुरूच; डंपरसह साडेबारा लाखांचा ऐवज लंपास

**यवत, ता. १४ :** यवत पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून दिवसेंदिवस घरफोडीच्या घटना वाढताना दिसत आहे. यामुळे नागरिक चांगलेच धास्तावले आहे. दौंड तालुक्यातील वरवंड येथील वकिलवस्ती परिसरात पहाटेच्या सुमारास धाडसी घरफोडीची घटना घडली असून अज्ञात चोरट्यांनी घरात घुसून घड्याळे, रोख रक्कम तसेच दोन मोटारसायकली आणि डंपरसह तब्बल १२ लाख ५० हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ही घटना गुरुवारी (ता. १२) पहाटे साडेचार वाजता घडली.

या प्रकारामुळे वरवंड व परिसरात खळबळ उडाली असून




नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी यवत पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अमोल रमेश दिवेकर (वय-३६, व्यवसाय शेती, रा. वरवंड वकिलवस्ती, ता. दौंड, जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी अमोल दिवेकरहे वकीलवस्ती येथे राहतात. गुरुवारी पहाटे साडेचार वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराच्या हॉलच्या खिडकीचे लोखंडी गज कशाच्या तरी सहाय्याने तोडले. त्या खिडकीवाटे चोरट्यांनी आत प्रवेश केला आणि बेडरूममधील लोखंडी कपाटावर डल्ला मारला. यावेळी कपटातील टायटन कंपनीची ४ मनगटी घड्याळे, रोख रक्कम २० हजार रुपये ऐवज पळवला.

चोरट्यांनी गावातील इतर ठिकाणांवरही हात साफ केला. चंद्रकांत प्रभाकर काकडे यांच्या घरासमोरील हिरो होंडा सीडी डॉन (चक १६ थ ८५५२) आणि कल्याण संजय कारंडे यांची हिरो होंडा सीडी डॉन (चक४२ ६४१२) या दोन मोटारसायकली चोरून नेण्यात आल्या. तसेच चक ४२ ढ ०९२० क्रमांकाचा अंदाजे १२ लाख रुपयांचा सहा टायरचा डंपर आणि त्यामधील चार हजार रुपये किमतीचा मुरुम देखील चोरट्यांनी पळवून नेल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, या घटनेत एकूण १२ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी बीएनएस कलम ३०५, ३०३ (२), ३३१(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एकाच रात्री घरफोडी आणि तीन वाहने चोरीला गेल्यामुळे यवत पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. यवत पोलीस शोध घेत आहेत.

## शिंदवणे येथे हॉटेल व्यावसायिकाला मारहाण; तिघांवर गुन्हा दाखल

**उरुळी कांचन, ता. १४ :** ह्या हद्दीत धंदा करायचा असेल, तर आमच्या पोरांना फुक्रट जेवायला घालावं लागेल, अशी दमदाटी करत शिंदवणे (ता. हवेली) येथे एका हॉटेल चालकावर तिघांनी लोखंडी रॉड आणि लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केल्याची घटना घडली. गुरुवारी (ता. १२) दुपारी चार वाजण्याच्या सुमारास हि घटना घडली.

योगेश बाजीराव मांढरे (वय-४०, व्यवसाय-शेती व हॉटेल रा. शिंदवणे, ता. हवेली) असे मारहाण झालेल्या हॉटेल व्यावसायिकाचे नाव आहे. तर श्रवण संतोष शिंदे, श्रेयस संदीप शिंदे, संग्राम शंकर शिंदे सर्व रा. शिंदवणे ता. हवेली) अशी मारहाण करणाऱ्या तिघांची नावे आहेत. याप्रकरणी मांढरे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार तिघांवर उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, योगेश बाजराव मांढरे यांचे शिंदवणे गावात हॉटेल आहे. गुरुवारी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास त्यांच्याच गावातील श्रवण शिंदे, श्रेयस शिंदे आणि संग्राम शिंदे हे तिघे हॉटेलवर आले. त्यांनी मांढरे यांना हॉटेलबाहेर बोलावून हद्दीची आणि फुकट जेवणाची भाषा करत वाद उकरून काढला.तुला आमच्या हद्दीत धंदा करायचा आहे तर पोरांना जेवायला फुक्रट चारता येत नाही का? असे म्हणत या तिघांनी मांढरे यांना शिवीगाळ सुरू केली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. आरोपींनी सोबत आणलेल्या लोखंडी रॉडने आणि लाकडी दांडक्याने मांढरे यांच्या डोक्याच्या पाठीमागील बाजूस, कानावर, पोटावर, कंबरेवर आणि तोंडावर तसेच माझे डावे हातावर मारहाण करून करंगळीचे हाड फॅक्चर केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## अनधिकृत विजेचा करंट लागून तरुणाचा मृत्यू; भिगवण पोलिसांकडून दोघांवर गुन्हा

**भिगवण, ता. १४ :** ढाब्याचा लोखंडी बोर्ड बसविण्याच्या कामावेळी वायर हलवण्यास सांगितल्याने विजेचा जोरदार धक्का बसूनगंभीर जखमी झालेल्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. भादलवाडी (ता. इंदापूर) येथे १५ फेब्रुवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. याप्रकरणी भिगवण पोलिसांनी दोघांवर गुन्हा दाखल करण्यत आला आहे.

सौरभ मच्छिंद्र कसबे (वय-२६, रा. मदनवाडी) असे विजेचा धक्का लागून मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी संतोष उर्फ मुकेश पवार (रा. मदनवाडी, ता. इंदापूर) आणि बळीराजा ढाब्याचे मालक सागर खाडे असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. याबाबत मयत सौरभ याचा भाऊ रोहित मच्छिंद्र कसबे (वय २८, रा. मदनवाडी-चौफुला, ता. इंदापूर) यांनी भिगवण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या



माहितीनुसार, रविवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास भादलवाडी (ता. इंदापूर) येथे बळीराजा ढाब्यासमोर आरोपी ढाब्याच्या नावाचा लोखंडी बोर्ड बसविण्याचे काम करत होते. त्यासाठी त्यांनी महावितरणच्या विजेच्या खांबावर अनधिकृतरीत्या इलेक्ट्रिक वायर टाकली होती.

यावेळी फिर्यादीचा भाऊ सौरभ मच्छिंद्र कसबे (वय-२६, रा. मदनवाडी) घटनास्थळी उपस्थित होता. आरोपींनी त्याला वायर हलवून विजेचा आकडा खाली पाडण्यास सांगितले. सौरभ यांनी असे काम जमत नसल्याचे सांगूनही आरोपींनी फक्त वायर धरून हलवली तर आकडा खाली पडेल असे सांगत त्याला तसे करण्यास प्रवृत्त केले. सौरभ कसबे यांनी उजव्या हाताने वायर पकडून ती हलवण्याचा प्रयत्न केला असता त्यांना विजेचा जोरदार धक्का बसला. या धक्क्यात त्यांच्या उजव्या हाताच्या बोटांना, छातीला व पाठीला गंभीर भाजले गेले. त्यानंतर त्यांना तातडीने पुण्यातील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असताना गुरुवारी (ता. ०५) रोजी पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे मदनवाडी परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, उपचारासाठी झालेल्या खर्चाबाबत पैसे मागितल्यावर आरोपींनी फिर्यादी रोहित कसबे व त्यांची बहीण आरती यांना शिवीगाळ करून दमदाटी केली. तुम्हाला काय तक्रार द्यायची ते द्या, असे म्हणत धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. अनधिकृतरीत्या विजेच्या खांबावर वायर टाकण्याचा प्रकार गंभीर मानला जात असून महावितरणकडूनही या प्रकरणात स्वतंत्र कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणी भिगवण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक वारगड करीत आहेत.

## वळती येथे ट्रॅक्टर अपघातात शिंदवणे येथील चालकाचा मृत्यू; एकजण जखमी

**उरुळी कांचन, ता. १४ :** शेताच्या बांधावरून घरी जाताना ट्रॅक्टर पलटी होऊन झालेल्या अपघातात शिंदवणे (ता. हवेली) येथील चालकाचा जागीच मृत्यू झाला. तर आणखी एकजण जखमी झाल्याची घटना वळती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीत बुधवारी (ता. ११) रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास घडली.

बाबू महादेव डोलारे (वय-५४, रा. शिंदवणे, ता. हवेली) असे अपघातात मयत झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. तर गणेश सुभाष महाडिक (वय-२१, व्यवसाय - शेती व ट्रान्सपोर्ट, रा. शिंदवणे वाक वस्ती, ता. हवेली) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी गणेश महाडिक यांनी दिलेल्या तक्रारीनुसार मयत बाबू डोलारे यांच्यावर विविध




कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मयत बाबू डोलारे हे ट्रॅक्टर क्रमांक चक१२ दद ३७६५ चालवत होते. दत्ता कुंजीर यांच्या शेताच्या बांधावरून ट्रॅक्टर नेत असताना त्यांनी वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून ट्रॅक्टर वेगात व बेदरकारपणे चालविल्याने ट्रॅक्टर पलटी झाला. या अपघातात डोलारे यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला.

या अपघातात फिर्यादी गणेश महाडिक हे देखील जखमी झाले असून ट्रॅक्टरचेही मोठे नुकसान झाले आहे. आपले ताब्यातील ट्रॅक्टर हा अविचाराने हायगयीने, बेकायदेशीरपणे वाहतुकीच्या नियम ांकडे दुर्लक्ष करून ट्रैक्टर चालवुण स्वत: पलटी करुन लहान मोठ्या जखमा होवुन स्वत: च्या मृत्यूस कारणीभूत झाले.

दरम्यान, ट्रॅक्टरचे नुकसानीस कारणीभूत झाल्याने त्याच्यावर उरुळी कांचन पोलीस ठाण्यात १०६(१), १२५(ब), १२५(अ), ३२४(४) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार उद्धव गायकवाड करीत आहेत.

## एसटी बसच्या धडकेत न्हावरे येथील तरूणाचा मृत्यु

योगेश मारणे

न्हावरे, ता. १४ : पुणेअहिल्यानगर महामार्गावरून शिरूर शहरात जाणाऱ्या रस्त्यावर एसटी बस व दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण धडक्त न्हावरे येथील एका तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी (ता. १३) सायंकाळी घडली.या घटनेची नोंद शिरूर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. चंद्रकांत जयसिंग भोसले (वय-२६, रा. न्हावरे, ता. शिरूर, जि. पुणे) असे अपघातात मृत्यू झालेल्या तरुणाचे नवा आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चंद्रकांत भोसले हा न्हावरे येथील तरुण आर्किटेक्ट असून नुकतेच शिक्षण पूर्ण करून परिसरात आपला व्यवसाय उभा करत होते. शुक्रवारी सायंकाळी पाचच्या सुमारास शिरूर येथे काम आटोपून तो दुचाकीवरून न्हावरेकडे परतत होता.



यावेळी तो शिरूर शहरातील नगरपालिका रस्त्याने येऊन मुख्य रस्ता क्रॉस करण्यासाठी दुचाकीवर थांबला असताना,पुणे बाजूकडून भरधाव वेगाने आलेल्या एसटी बसने त्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.या भीषण अपघातात भोसले यांच्या डोक्याला व पायाला गंभीर दुखापत झाली. स्थानिकांनी तातडीने त्यांना उपचारासाठी शिरूर येथील रुग्णालयात दाखल केले;मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या घटनेनंतर चंद्रकांत भोसले यांचे शवविच्छेदन शिरूर येथील रुग्णालयात करण्यात आले.अत्यंत हुशार व अभ्यासू असलेल्या चंद्रकांतने नुकतेच आर्किटेक्टचे शिक्षण पूर्ण करून न्हावरे परिसरात आपला व्यवसाय सुरू केला होता. त्याचा स्वभाव मनमिळावू असल्याने गावात व परिसरात त्याचा मोठा मित्रपरिवार आहे.

दरम्यान, या अपघाती मृत्यूमुळे न्हावरे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी मयत तरुणाचे वडील तथा माजी सैनिक जयसिंग भोसले यांनी शिरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पुढील तपास पोलीस करत आहेत. चंद्रकांत भोसले यांच्या पश्चात वडील व बहीण असा परिवार आहे.

## जिंती परिसरात जिओची सेवा कोलमडली वारंवार नेटवर्क बंद पडल्याने नागरिक हैराण

**करमाळा, ता. १४ :** जिंती (ता. करमाळा) व परिसरात मोबाईल नेटवर्क सेवा देणाऱ्या रिलायन्स जिओ कंपनीच्या सेवेचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचे चित्र दिसत आहे. वारंवार नेटवर्क खंडित होत असल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून संतप्त नागरिकांनी या सेवेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शनिवारी (ता. १४) सकाळी अचानक जिओचे नेटवर्क पूर्णपणे बंद पडले. तब्बल तीन तासांहून अधिक काळ सेवा ठप्प राहिल्याने जिंती व परिसरातील हजारो नागरिक अक्षरशः हैराण झाले. मोबाईल कॉल, इंटरनेट सेवा, ऑनलाईन व्यवहार, बँकिंग कामे तसेच शासकीय व खासगी




कामांमध्ये मोठा अडथळा निर्माण झाला. अनेकांचे महत्त्वाचे फोन कॉल लागत नसल्याने एकमेकांशी संपर्क साधणेही कठीण झाले.

सध्याच्या डिजिटल युगात मोबाईल नेटवर्क ही अत्यावश्यक सेवा बनली आहे. शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी, व्यावसायिक आणि ऑनलाईन व्यवहार करणारे नागरिक पूर्णपणे मोबाईल इंटरनेटवर अवलंबून आहेत. मात्र जिंती परिसरात जिओचे नेटवर्क वारंवार बंद पडत असल्याने नागरिकांची चांगलीच दमछाक होत आहे. काही वेळा कॉल लागत नाहीत, तर कधी इंटरनेट पूर्णपणे बंद पडते, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मोबाईल नेटवर्क बंद पडल्या मुळे युपीआय आणि ऑनलाईन पेमेंट व्यवहार ठप्प झाले. अनेक दुकानदारांना ग्राहकांचे व्यवहार करता आले नाहीत. विद्यार्थ्यांचे ऑनलाईन वर्ग, शेतकऱ्यांचे बाजारभाव पाहण्याचे काम तसेच इतर ऑनलाईन सेवा पूर्णपणे विस्कळीत झाल्या. त्यामुळे नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर संताप व्यक्त होत आहे.

जिंती परिसरात मागील काही महिन्यांपासून नेटवर्क खंडित होण्याच्या तक्रारी सातत्याने होत आहेत, मात्र अद्याप कंपनीकडून ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही, अशी तक्रार नागरिकांनी केली आहे. वारंवार सेवा बंद पडत असल्यामुळे नागरिकांनी आता कंपनीविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत मोठमोठ्या जाहिराती करून उत्तम सेवा देण्याचे आश्वासन दिले जाते; पण प्रत्यक्षात मात्र सेवा अत्यंत निकृष्ट दर्जाची आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया दिली.

दरम्यान, नागरिकांनी संबंधित कंपनीने तातडीने या समस्येकडे लक्ष देऊन जिंती परिसरातील नेटवर्क व्यवस्था सुधारावी, अतिरिक्त टॉवर उभारावेत आणि सेवा सुरळीत करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा येत्या काळात ग्राहकांकडून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही स्थानिकांनी दिला आहे.

# पुण्यात लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार; तरुणावर गुन्हा

**पुणे, ता. १४ :** लग्नाचे आमिष दाखवून एका तरुणीवर दीर्घकाळ लैंगिक अत्याचार केल्याचा आणि लग्नाच्या चर्चेदरम्यान जातीवाचक शिवीगाळ केल्याचा गंभीर प्रकार पुण्यात उघडकीस आला आहे. या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात अ‍ॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून अक्षय संदीप बागुल (वय ३३, रा. साई पार्क सोसायटी, त्रिमूर्ती चौक, भारती विद्यापीठ परिसर) याच्यावर आरोप ठेवण्यात आले आहेत.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित ३३ वर्षीय तरुणीची आरोपीशी ओळख झाल्यानंतर त्याने तिच्याशी लग्न करण्याचे आश्वासन दिले. या विश्वासावर आरोपीने २०२३ पासून ऑक्टोबर २०२५ पर्यंत विविध ठिकाणी नेऊन तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले, असा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या काळात आरोपीने मोबाईलवर अश्लील व्हिडिओ दाखवत अनैसर्गिक संबंध ठेवण्यास भाग पाडल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, आरोपीकडून वारंवार भांडणे करून शिवीगाळ करण्यात येत होती. तसेच जीवे मारण्याच्या धमक्याही दिल्या जात होत्या. पुढे लग्नाबाबत दोन्ही कुटुंबीयांमध्ये चर्चा सुरू असताना आरोपीने बैठकीदरम्यान जातीवाचक शिवीगाळ केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तरीही आरोपी लग्नास तयार होईल या अपेक्षेने पीडित तरुणी काही काळ वाट पाहत होती.

मात्र अखेरीस आरोपीने लग्नास नकार दिल्याने तसेच तिचे शारीरिक, मानसिक आणि आर्थिक शोषण झाल्याची जाणीव झाल्यानंतर पीडित तरुणीने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस आयुक्त राहुल आवारे करत आहेत. लग्नाचे आमिष दाखवून महिलांचे शोषण केल्याच्या घटना अधूनमधून समोर येत असून अशा प्रकरणांमध्ये कठोर कारवाईची मागणीही वारंवार होत आहे.

# जलसंपदा विभागाचा महापालिकेला अल्टिमेटम, शहरावर पाणीबाणीचे सावट

**पुणे, ता. १४ :** भर उन्हाळा सुरू होण्याच्या तोंडावर पुणे शहरावर पाणीटंचाईचे गंभीर संकट ओढवण्याची शक्यता निर्माण झाली आहे. खडकवासला धरण प्रकल्पाची तब्बल ९४८ कोटी रुपयांची पाणीपट्टी थकीत असल्याने जलसंपदा विभागाने पुणे महापालिकेला कडक इशारा दिला आहे. येत्या २३ मार्चपर्यंत थकीत रक्कम जमा न केल्यास २४ मार्चपासून पुण्याचा पाणीपुरवठा थांबवण्याची कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आल्याने महापालिका प्रशासनात खळबळ उडाली आहे.



या वादाचे मूळ कारण पाणी वापराच्या प्रमाणाशी संबंधित आहे. जलसंपदा विभागाच्या म्हणण्यानुसार, पुणे शहरासाठी खडकवासला प्रकल्पातून दरवर्षी ११.६० टीएमसी पाणी वापरण्याची परवानगी आहे. मात्र प्रत्यक्षात महापालिका दरवर्षी सुमारे ८ ते ९ टीएमसी अतिरिक्त पाणी वापरत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या अतिरिक्त पाण्यासाठी दंडासह दरवर्षी सुमारे ३०० कोटी रुपये भरावे लागतात. मात्र चालू आर्थिक वर्षात महापालिकेने केवळ ९७ कोटी रुपये भरल्यामुळे थकबाकीची रक्कम मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, या मुद्द्यावर महापालिका आणि जलसंपदा विभाग यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी महापालिकेचेच सुमारे ४११ कोटी रुपये जलसंपदा विभागाकडे अतिरिक्त जमा असल्याचा दावा केला आहे. मात्र जलसंपदा विभागाने हा दावा फेटाळून लावत आधी थकीत रक्कम भरण्याची मागणी केली आहे.

याशिवाय शहरातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचाही मुद्दा पुढे आला आहे. दरवर्षी सुमारे १३ टीएमसी सांडपाण्यावर प्रक्रिया न करता ते नदीपात्रात सोडले जात असल्याचा आरोप जलसंपदा विभागाने केला आहे. त्यामुळे महापालिकेवर अतिरिक्त दंडही आकारला जात आहे. फेब्रुवारी अखेरपर्यंत महापालिकेने १.२४ टीएमसी अतिरिक्त पाणी वापरल्याचेही समोर आले आहे. दोन्ही विभागांतील हा वाद लवकर सुटला नाही तर उन्हाळ्याच्या तोंडावर पुणेकरांना पाणीटंचाईचा मोठा फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत या प्रश्नावर तोडगा निघतो का, याकडे शहराचे लक्ष लागले आहे.

# युद्धाच्या पार्श्वभूमीवर इथेनॉल कोटा वाढवा; साखर निर्यातीसाठीही मदत हवी : हर्षवर्धन पाटील

सागर जगदाळे

**भिगवण, ता. १४ :** आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे क्रूड ऑइलच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे केंद्र सरकारचे धोरण प्रभावीपणे राबवण्यासाठी साखर कारखान्यांना इथेनॉलचा कोटा तातडीने वाढवून द्यावा. त्यामुळे पेट्रोल दरवाढीचा भार काही प्रमाणात कमी होऊन जनतेला दिलासा मिळू शकतो, असे मत हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केले.



राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ, नवी दिल्लीचे अध्यक्ष असलेल्या हर्षवर्धन पाटील यांनी याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्याकडे विविध मागण्या मांडत तातडीने निर्णय घेण्याची विनंती केल्याचे सांगितले.

पाटील म्हणाले की, आखाती युद्धामुळे देशात क्रूड ऑइल आणि गॅसच्या पुरवठ्यावर परिणाम जाणवत असून क्रूड ऑइलच्या बॅरेलचे दर वाढत आहेत. सध्या इथेनॉलचे दर सुमारे ६० ते ६५ रुपये प्रति लिटर आहेत, तर क्रूड ऑइलचे दर १०० रुपयांच्या पुढे गेले आहेत. त्यामुळे पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रण केल्यास पेट्रोल दरवाढीचा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकतो.

देशात सुमारे २ हजार कोटी लिटर इथेनॉल निर्मितीची क्षमता आहे. त्यामुळे केंद्र सरकारने तातडीने १५० कोटी लिटर इथेनॉलचे टेंडर काढल्यास साखर कारखान्यांमधील सिरप (रसा) व बी-हेवी मोलॅसिसपासून मोठ्या प्रमाणात इथेनॉल निर्मिती करता येईल. याशिवाय मका, तांदूळ, ज्वारी, गहू यांसारख्या धान्यांपासूनही इथेनॉल तयार करता येईल. तसेच गोदामांमध्ये साठवलेल्या धान्याचाही उपयोग इथेनॉल निर्मितीसाठी करता येऊ शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

## साखर निर्यातीसाठीही मदतीची गरज

केंद्र सरकारने १५ लाख मेट्रिक टन साखर निर्यातीस परवानगी दिली आहे. त्यापैकी साडेसात लाख मेट्रिक टन साखरेचे करार झाले असून अडीच लाख मेट्रिक टन साखर निर्यात झाली आहे. मात्र युद्धामुळे अडीच लाख मेट्रिक टन साखर समुद्रात अडकली आहे, तर २ लाख मेट्रिक टन साखर बंदरांवर पडून आहे. त्यामुळे साखर निर्यातीसंदर्भात केंद्र सरकारने तातडीने मदतीचे धोरण आखण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच साखरेची एमएसपी प्रति किलो ४१ रुपये करण्याचा निर्णयही तातडीने घेण्याची मागणी त्यांनी केली.

# अ‍ॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत आता थेट अटक नाही; चौकशीत गुन्हा सिद्ध व्हावा लागेल : मंत्री शिरसाट

**मुंबई, ता. १४ :** अ‍ॅट्रॉसिटी कायद्याचा पूर्वी गैरवापर होत असे, त्यामुळे या कायद्यात महत्त्वाचे बदल करण्यात आले असून आता एफआयआर दाखल झाल्यावर तातडीने अटक न करता आधी समितीमार्फत चौकशी होईल आणि गुन्हा सिद्ध झाला तरच अटक केली जाईल, अशी माहिती सामाजिक न्याय मंत्री तथा शिवसेना (शिंदे गट) नेते संजय शिरसाट यांनी विधानपरिषदेत दिली. कोणावरही विनाकारण अन्याय होऊ नये, हा या बदलामागील उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



शिरसाट यांनी विधानपरिषदेत बोलताना सांगितले की, पूर्वी अ‍ॅट्रॉसिटीचे गुन्हे सर्रासपणे दाखल केले जायचे. एखाद्याने शिवी दिली असे म्हणून जरी पोलीस ठाण्यात गेले तरी आरोपीवर अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल व्हायचा. गुन्हा दाखल झाल्यावर २४ तासांच्या आत अटक करण्याचा नियमही होता आणि त्यानुसार काही ठिकाणी अटकाही व्हायच्या. या कायद्याचा काही प्रमाणात गैरवापर झाल्याचे नाकारता येत नाही, हे शिरसाट यांनी मान्य केले.

बदललेल्या कायद्यानुसार आता एफआयआर नोंदवता येईल, मात्र अटक करण्यापूर्वी तपास अधिकारी (IO) संपूर्ण खात्री करेल. चौकशीत गुन्हा चुकीचा आढळल्यास तपास अधिकारी कलम १६९ नुसार समरी देतो. त्यानंतर न्यायालयात प्रकरण आल्यावर ही समरी जोडली जाते आणि केस मागे घेतली जाते. थोडक्यात, गुन्हा सिद्ध झाला तरच अटक होईल, अन्यथा एफआयआर रद्द होतो, अशी नवी प्रक्रिया लागू करण्यात आली आहे.

**खोट्या तक्रारींवरही कारवाईचा विचार**

शिरसाट पुढे म्हणाले की, अन्याय झाला असेल तर गुन्हा दाखल झालाच पाहिजे. मात्र खोट्या तक्रारी करणाऱ्यांवरही कायद्यात काही तरतूद करता येईल का, याचाही शासन विचार करेल. तातडीने अटक करण्याची जी पद्धत होती ती आता थांबवण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**अ‍ॅट्रॉसिटी कायदा म्हणजे काय?**

अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) च्या सदस्यांवरील अत्याचार रोखण्यासाठी १९८९ मध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ संमत करण्यात आला. याला सामान्यतः अ‍ॅट्रॉसिटी कायदा म्हटले जाते. या समाजातील व्यक्तींविरुद्ध केला जाणारा क्रूर अत्याचार किंवा अन्यायकारक कृत्य म्हणजे अ‍ॅट्रॉसिटी असून हे या कायद्याअंतर्गत फौजदारी गुन्हा मानले जाते.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



# घरच्या घरी बिर्याणी मसाला बनवा आणि जेवणाची लज्जत वाढवा

भाज्या असो, डाळी असो किंवा बिर्याणीसारखे खास पदार्थ असो यांमध्ये योग्य मसाल्यांचा वापर जेवणाला चवदार बनवतो. म्हणूनच हिंदुस्थानी स्वयंपाकघरांमध्ये विविध प्रकारचे मसाले नेहमीच साठवेले असतात. किचन किंग मसाला, बिर्याणी मसाला आणि गरम मसाला सारखे मसाले जवळजवळ प्रत्येक घरात सामान्य आहेत.

आजकाल बाजारात अनेक तयार मसाले सहज उपलब्ध असले तरी, घरगुती मसाले हा एक अनोखा अनुभव असतो. घरगुती मसाले केवळ ताजे आणि अधिक सुगंधित नसतात, तर त्यात कोणतेही संरक्षक किंवा भेसळ केलेली नसते. असेच काही मसाले घरी बनवण्याची पद्धत आपण या लेखात जाणुन घेउया.

किचन किंग मसाला : किचन किंग मसाला बनवण्यासाठी, प्रथम धणे, जिरे, काळी मिरी, लवंग, दालचिनी, वेलची, सुक्या लाल मिरच्या आणि थोडी हळद घ्या. हे सर्व मसाले मंद आचेवर सुगंध येईपर्यंत भाजून घ्या. थंड झाल्यावर, त्यांना मिक्सरमध्ये बारीक वाटून बारीक पावडर बनवा. तयार केलेला मसाला हवाबंद डब्यात ठेवा तायार आहे किचन किंग मसाला.

बिर्याणी मसाला : बिर्याणी मसाला बनवण्यासाठी, तमालपत्र, दालचिनी, लवंग, काळी मिरी, मोठी वेलची, लहान वेलची, एका जातीची बडीशेप आणि जावित्री घ्या. हे मसाले हलकेभाजून घ्या आणि थंड झाल्यावर, त्यांना बारीक पावडर करुन घ्या. हा मसाला बिर्याणी, पुलाव आणि विशेष भाताच्या पदार्थांमध्ये वापरता येतो.

पावभाजी मसाला : पावभाजी मसाला बनवायला अगदी सोपा आहे. तुम्हाला फक्त धणे, जिरे, एका जातीची बडीशेप, काळी मिरी, सुक्या लाल मिरच्या, दालचिनी, लवंगा आणि आंब्याची पावडर लागेल. हे मसाले एका तव्यावर हलकेभाजून घ्या. थंड झाल्यावर त्यांची पावडर बनवा. तयार आहे तुमचा पावभाजी मसाला.

छोले मसाला : छोले मसाला बनवण्यासाठी धणे, जिरे, काळी मिरी, दालचिनी, लवंगा, डाळिंबाचे दाणे, सुक्या लाल मिरच्या आणि थोडी कसुरी मेथीची गरज आहे. हे मसाले हलकेभाजून घ्या, थंड होऊ द्या आणि नंतर मिक्सरमध्ये बारीक करा. हा मसाला विशेषतः हरभरा करीमध्ये वापरला जातो, ज्यामुळे त्याची चव वाढते.

गरम मसाला : गरम मसाला बनवण्यासाठी दालचिनी, लवंगा, काळी मिरी, लहान वेलची, मोठी वेलची आणि तमालपत्र घ्या. हे मसाले मंद आचेवर भाजून घ्या जेणेकरून त्यांचा सुगंध सुटेल. नंतर, त्यांना पूर्णपणे थंड होऊ द्या आणि मिक्सरमध्ये पावडरमध्ये बारीक करा. तुमचा गरम मसाला हा प्रत्येक जेवणाचा प्राण असतो यामुळे पदार्थाची अप्रतिम चव आणि सुगंध वाढवतो.

# चारित्र्य व व्यक्तिमत्त्व निर्मितीतून राष्ट्रनिर्मिती : स्वामी रामदेव

## बोरीबेल येथे लाईफ ट्रान्सफॉर्मेशन सेंटरचे उद्धाटन

सागर जगदाळे

भिगवण, ता. १४ : राष्ट्रनिर्मितीसाठी केवळ राजकारण नव्हे तर समाजाची सक्रिय भागीदारी आवश्यक आहे. संघर्ष आणि प्रतिकूल परिस्थितीतूनच प्रतिभा घडते. अशा प्रतिभेला दिशा देणारे लाईफ ट्रान्सफॉर्मेशन सेंटर विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवेल, असे प्रतिपादन स्वामी रामदेव यांनी केले.

दौंड तालुक्यातील बोरीबेल येथे सौ. उर्मिला वि. कराड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उभारण्यात आलेल्या लाईफ ट्रान्सफॉर्मेशन सेंटर (एलटीसी) च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.



डॉ. विश्वनाथ कराड होते. या केंद्राचे संकल्पक डॉ. राहुल विश्वनाथ कराड उपस्थित होते. यावेळी लाईफ ट्रान्सफॉर्मेशन सेंटरच्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाला पद्मश्री पोपटराव पवार, राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार विजेते रंजन सोधी, संजीव निकम, नंदकिशोर पाचपुते, ह.भ.प. बापूसाहेब मोरे, आमदार रमेशअप्पा कराड, राजेश कराड, योगेश पाटील, एमआयटी डब्ल्यूपीयूचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रसाद खांडेकर तसेच विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते.

स्वामी रामदेव म्हणाले, जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी शिक्षणाबरोबर स्वयंशिस्त अत्यंत आवश्यक आहे. तरुणांमध्ये प्रचंड क्षमता आहे. त्यांनी आपली स्वप्ने केवळ नोकरी किंवा पगारापुरती मर्यादित न ठेवता समाज आणि देशासाठी काम करण्याचे ध्येय ठेवावे. धैर्य, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या बळावर सातत्याने प्रयत्न केल्यास कोणतेही ध्येय साध्य करता येते.

डिजिटल माध्यमांमुळे मुले मोठा वेळ वाया घालवत असल्याची खंत व्यक्त करत त्यांनी ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्था उभी करण्याची गरज अधोरेखित केली.

दरम्यान, शिवराज सिंह चौहान यांनी ऑनलाईन संदेशातून लाईफ ट्रान्सफॉर्मेशन सेंटर हा महत्त्वाचा उपक्रम असल्याचे सांगितले. या माध्यमातून आत्मविश्वासू व समाजाभिमुख युवक घडण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही ऑनलाईन शुभेच्छा देत डॉ. राहुल कराड यांच्या पुढाकारातून उभारलेले हे केंद्र शिक्षण क्षेत्राला नवी दिशा देईल, असा विश्वास व्यक्त केला.

दरम्यान, डॉ. राहुल कराड यांनी सांगितले की, कृषी व निसर्ग, शारीरिक तंदुरुस्ती व खेळ, संघटन कौशल्य व नेतृत्व, देशभक्ती व राष्ट्रनिर्माण तसेच अध्यात्म व मनः शांती या पाच घटकांवर हे केंद्र आधारित असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ते कार्य करेल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गौतम बापट यांनी केले, तर डॉ. प्रसाद खांडेकर यांनी आभार मानले.

# विद्यार्थिनींना प्रवेश नाकारणाऱ्या महाविद्यालयांवर होणार कारवाई; चंद्रकांत पाटील यांचा थेट इशारा

मुंबई, ता. १४ : राज्य सरकारच्या शुल्क माफी योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थिनींना प्रवेश नाकारणाऱ्या महाराष्ट्रातील महाविद्यालयांवर कडक कारवाई केली जाणार असल्याचा थेट इशारा राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी विधानसभेत दिला. अशा संस्थांची संलग्नता रद्द करण्यापर्यंतची पावले सरकार उचलणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

व्यावसायिक अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थिनींचे शिक्षण शुल्क पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने दोन वर्षांपूर्वी घेतला होता. या निर्णयामुळे उच्च शिक्षणातील महिलांच्या सहभागाम ध्ये ४१ टक्क्यांची मोठी वाढ झाली




आहे. २०२३ -२४ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थिनींची संख्या ८५ हजार ६८ वरून थेट १ लाख १५ हजार ८०० वर पोहोचली आहे. काही म हाविद्यालये विद्यार्थिनींना आधी पूर्ण शुल्क भरण्याची सक्ती करून नंतर परतावा घेण्यास सांगत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असल्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

यावर कडक उपाययोजना राज्य सरकारच्या वतीने करण्यात आल्या असल्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. तक्रारींवरील उपाय म्हणून प्रत्येक महाविद्यालयात नोडल अधिकारी नियुक्त करणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच महा-एमबीटी पोर्टलवरील अर्जासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची संख्या १७ वरून ८ पर्यंत कमी करण्यात आली असल्याचे माहिती मंत्र्यांनी दिली. विद्यार्थिनींची शिष्यवृत्ती आणि परताव्याचे वितरण पगाराच्या वितरणाप्रमाणेच प्राधान्याने केले जाणार असल्याचे देखील त्यांनी बोलताना नमूद केले.

याव्यतिरिक्त, वसतिगृह न मिळाल्यास विद्यार्थिनींना दरमहा सहा हजार रुपयांपर्यंत निवास भत्ता आणि कमवा व शिका योजनेअंतर्गत दरमहा दोन हजार रुपये मानधन देण्याची तरतूदही करण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांची माहिती तातडीने सरकारला देण्याचे आवाहनही मंत्र्यांनी यावेळी केले.

# मराठी भाषा न शिकवणाऱ्या शाळांची मान्यता रद्द करण्यात येईल : दादा भुसे

पुणे, ता. १४ : राज्यातील शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे अनिवार्य असताना काही ठिकाणी मराठी शिकवली जात नसल्याच्या तक्रारी समोर आल्याने राज्य सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. मराठी भाषा न शिकवणाऱ्या शाळा आणि संस्थांची मान्यता रद्द करण्यात येईल, अशी घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी केली आहे.



विधानसभेत यासंदर्भात माहिती देताना दादा भुसे म्हणाले की, ज्या माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवली जात नाही अशा तक्रारी प्राप्त झाल्यास तात्काळ चौकशी केली जाईल. चौकशीत संबंधित शाळेत मराठी शिकवली जात नसल्याचे आढळल्यास प्रथम त्या शाळेला सूचना दिल्या जातील. मात्र त्यानंतरही नियमांचे पालन न झाल्यास संबंधित शाळा आणि संस्थांची मान्यता रद्द करण्यात येईल.

दरम्यान, मुंबई येथील काही इंटरनॅशनल शाळांमध्ये मराठी शिकवली जात नसल्याचा मुद्दा शिवसेना युबीटीचे आमदार हारूण खान यांनी विधानसभेत उपस्थित केला होता. त्यावर झालेल्या चर्चेदरम्यान शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली.

राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे बंधनकारक असून याची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# करवसुलीसाठी भोर नगरपालिकेकडून चौकाचौकात थकबाकीदारांची नावे जाहीर

इम्रान अत्तार

भोर, ता. १४ : आर्थिक वर्षाचा शेवट जवळ येत असताना कर वसुलीसाठी भोर नगरपालिका प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. शहरातील मालमत्ता कर आणि पाणीपट्टी थकवणाऱ्या नागरिकांविरुद्ध कारवाई सुरू करत शहरातील १७ ठिकाणी थकबाकीदारांची नावे असलेले बॅनर लावण्यात आले आहेत.




पालिकेने प्रत्येक प्रभागातील थकबाकीदारांची नावे असलेले बॅनर त्या त्या प्रभागातील प्रमुख चौकांम ध्ये लावले असून, त्यामुळे शहरात चांगलीच चर्चा रंगली आहे. वारंवार आवाहन करूनही नागरिकांनी कर भरला नसल्याने नगरपालिकेला थेट नाव जाहीर करण्याचा निर्णय घ्यावा लागल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

नगरपालिकेच्या माहितीनुसार, सध्या सुमारे अडीच कोटी रुपयांची कर वसुली झाली आहे, मात्र अजूनही साडेतीन कोटी रुपयांचा कर थकीत आहे. आर्थिक वर्ष संपण्यास अवघे काही दिवस शिल्लक असताना थकबाकी मोठ्या प्रमाणात असल्याने प्रशासनाने ही कठोर पावले उचलली आहेत. दरम्यान, पालिकेने स्पष्ट इशारा देत म्हटले आहे की, पुढील काही दिवसांत थकीत कर न भरल्यास संबंधित मालमत्ता सील करण्यात येणार असून, थकबाकीदारांचे पाणी नळ कनेक्शनही तोडले जाणार आहे. चौकाचौकात लावलेल्या बॅनरमुळे शहरात खळबळ उडाली आहे.

# ई–रिक्षा व ई–बाइकसाठीही परवाना बंधनकारक; प्रताप सरनाईक यांची माहिती

मुंबई, ता. १४ : राज्यात रिक्षा आणि टॅक्सींसाठी नवीन परमिट देण्याची प्रक्रिया गेल्या दोन दिवसांपासून तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. प्रवासी वाहतूक करणाऱ्या ई-रिक्षा व ई-बाइकना यापुढे मोटार वाहन विभागाकडे रितसर नोंदणी करुन परवाना घेणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

सरनाईक म्हणाले की, आतापर्यंत इलेक्ट्रिक रिक्षांना (ई-रिक्षा) प्रवासी वाहतुकीसाठी स्वतंत्र परमिट घेण्याची सक्ती नव्हती. मात्र, वाढत्या ई-वाहनांच्या संख्येचा विचार करता प्रवासी वाहतुकीत एकसमान नियम लागू करण्यासाठी ई-रिक्षा व ई-बाइक साठीही परवाना प्रक्रिया बंधनकारक करण्याचा निर्णय



घेण्यात येत आहे.

या निर्णयामुळे पारंपरिक रिक्षा, टॅक्सी आणि इलेक्ट्रिक रिक्षा या सर्व प्रकारच्या वाहनांसाठी समान नियम लागू राहतील. प्रवासी वाहतुकीच्या व्यवस्थेत पारदर्शकता वाढविणे आणि अनियमितता टाळणे हा याम ागील उद्देश आहे.

या निर्णयामुळे प्रवासी वाहतुकीच्या व्यवस्थेत अधिक शिस्त येईल, नियमांचे पालन सुनिश्चित होईल आणि भविष्यात प्रवाशांना सुरक्षित व नियंत्रित सेवा उपलब्ध होण्यास मदत होईल, असा विश्वास मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

एक खिडकी योजनेची तयारी परवाना प्रक्रियेत सुलभता आणण्यासाठी परिवहन विभागाकडून एक खिडकी योजना सुरू करण्याची तयारी सुरू आहे. या योजनेअंतर्गत अर्ज स्वीकारणे, कागदपत्रांची पडताळणी आणि मंजुरी प्रक्रिया एकाच ठिकाणी सुलभ पद्धतीने पार पाडली जाणार आहे. तथापि, कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार किंवा अनियमितता टाळण्यासाठी प्रवासी वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांसाठी परमिट घेणे अनिवार्य



# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अर्थसंकल्पावरील घडी पुस्तिकेचे प्रकाशन

नागपूर, दि. १४ : माहिती व जनसंपर्क विभागाच्या नागपूर विभागीय माहिती संचालक कार्यालयाने महाराष्ट्र शासनाच्या आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी सादर अर्थसंकल्पामध्ये विदर्भासाठी करण्यात आलेल्या तरतुदींवर आधारित घडी पुस्तिकेचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आले.

मुख्यमंत्री यांच्या रामगिरी शासकीय निवासस्थानी आयोजित अनौपचारिक कार्यक्रमात हे प्रकाशन पार पडले. नागपूर-अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे, सहायक संचालक पल्लवी धारव, माहिती अधिकारी रितेश भुयार, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रसिद्धी समन्वयक अविनाश महालक्ष्मे, रमाकांत दाणी, अनिल गडेकर यावेळी उपस्थित होते. अर्थसंकल्पात विदर्भातील कृषी, आरोग्य, उद्योग, शिक्षण, पायाभूत सुविधा आदींबाबत करण्यात आलेल्या तरतुदींची माहिती वैविध्यपूर्ण ग्राफिक्सद्वारे घडी पुस्तिकेत देण्यात आली आहेत. उत्तम रंगसंगती आणि मांडणीमुळे घडी पुस्तिका आकर्षक झाली आहे. विविध शासकीय कार्यालये आणि प्रसार माध्यमांसाठी ही घडी पुस्तिका संदर्भ म्हणून उपयुक्त ठरणार आहे.

# बेरोजगारांसाठी पुण्यात १९०० पदांसाठी मेगा भरती मेळावा

पुणे, ता. १४ : पुणे जिल्ह्यात नोकरीच्या शोधात असलेल्या तरुणांसाठी रोजगाराची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि एशियन कॉलेज ऑफ सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा १७ मार्च रोजी सकाळी १० वाजता नऱ्हेधायरी रोडवरील पारी कंपनी चौक येथील एशियन कॉलेज ऑफ सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्समध्ये आयोजित करण्यात येणार आहे.

या रोजगार मेळाव्यात पुणे जिल्ह्यातील औद्योगिक परिसरातील सुमारे २४ कंपन्या सहभागी होणार आहेत. या कंपन्यांमार्फत जवळपास १९०० पेक्षा अधिक रिक्त पदांसाठी उमेदवारांची निवड केली जाणार आहे. उत्पादन, सेवा, विक्री, तांत्रिक आणि




इतर विविध क्षेत्रांमधील पदांसाठी भरती केली जाणार असून १० वी, १२ वी, डिप्लोमा तसेच पदवीधर पात्रता असलेल्या उमेदवारांना या मेळाव्यात संधी मिळणार आहे.

राज्यात बेरोजगारीचा प्रश्न लक्षात घेता अशा रोजगार मेळाव्यांद्वारे उद्योग आणि नोकरी इच्छुक यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला जातो. उमेदवारांना एका ठिकाणी अनेक कंपन्यांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधण्याची आणि प्रत्यक्ष मुलाखत देण्याची संधी मिळते. त्यामुळे अल्पावधीत नोकरी मिळण्याची शक्यता वाढते.

इच्छुक उमेदवारांनी रिक्त पदांबाबत सविस्तर माहिती आणि नोंदणीसाठी www.rojgar.mahaswayam.gov.in(http://www.rojgar.mahaswayam.gov.in) या संकेतस्थळाला भेट द्यावी. मेळाव्यात खाजगी क्षेत्रातील विविध पदांसाठी प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या जाणार असल्यामुळे उमेदवारांनी आपली शैक्षणिक कागदपत्रे, ओळखपत्र आणि आवश्यक अर्जांच्या छायांकित प्रती सोबत आणाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्याबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रास्ता पेठ, पुणे येथे संपर्क साधता येईल. तसेच ०२०-२६१३३६०६ या दूरध्वनी क्रमांकावरही माहिती उपलब्ध असल्याचे संबंधित कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे.

# कोल्हापूरातील अंबाबाईचे दर्शन चार दिवस बंद; गाभाऱ्याचे जतन व संवर्धनाचे काम

कोल्हापुर, ता. १४ : साडेतीन शक्तीपीठांपैकी एक आणि देश-विदेशातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या कोल्हापूर येथील श्री करवीर निवासिनी अंबाबाई मंदिरात सध्या जतन आणि संवर्धनाची महत्त्वाची कामे सुरू आहेत. मंदिर विकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यांतर्गत सुरू असलेल्या या कामांमुळे शनिवार १४ मार्च ते मंगळवार १७ मार्च २०२६ या ४ दिवसांच्या कालावधीत देवीच्या गाभाऱ्यातील मूळ मूर्तीचे दर्शन बंद ठेवण्याचा निर्णय मंदिर प्रशासनाने घेतला आहे.

मात्र या काळात भाविकांना पूर्णपणे दर्शन बंद राहणार नाही. मंदिर प्रशासनाने उत्सवमूर्ती तसेच प्राणप्रतिष्ठापित मंगल



श्रीकलशाची प्रतिष्ठापना पितळी उंबऱ्याबाहेर असलेल्या मुक्ती मंडपात केली आहे. त्यामुळे भाविकांना येथे देवीचे दर्शन घेता येणार असून अभिषेक सेवा आणि इतर धार्मिक विधी नेहमीप्रमाणे सुरू राहतील.

मंदिर विकास प्रकल्पांतर्गत गाभाऱ्याचे संरक्षण आणि म जबुतीकरण ही अत्यंत महत्त्वाची कामे हाती घेण्यात आली आहेत. पुरातत्व तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली मंदिरातील श्री महाकाली, श्री महालक्ष्मी, श्री अंबाबाई आणि श्री महासरस्वती या ३ गर्भगृहांच्या अंतर्गत व बाह्य भागांची स्वच्छता, सॅण्ड ब्लास्टिंग, वॉशिंग आणि दगडी भिंती-फरशीचे जतन सुरू आहे. या प्रक्रियेमुळे शेकडो वर्षे जुन्या दगडी बांधकामातील भेगा आणि चिरा भरून काढून मंदिराची रचना अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

याच टप्प्यात मुख्य पेटी चौकापासून गाभाऱ्यापर्यंत असलेल्या दगडी फरशीचे नूतनीकरण, दगडांची जोडणी आणि सुरक्षिततेसाठी आवश्यक बांधकामाची कामे केली जात आहेत. या कामांमुळे मंदिर परिसर अधिक सुरक्षित, सुबक आणि भाविकांसाठी सोयीस्कर करण्याचा उद्देश आहे.

मंदिर प्रशासनाच्या माहितीनुसार १७ मार्च रोजी आगमोक्त आणि वेदोक्त धार्मिक विधी तसेच पूर्णाहुती झाल्यानंतर दुपारी सुमारे १२:३० वाजता होणाऱ्या साडेबाराच्या आरतीपासून देवीच्या मूळ मूर्तीचे दर्शन पुन्हा सुरू होईल.

दरम्यान, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीने भाविकांना या काही दिवसांत संयम राखून मंदिरातील संवर्धन कामांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. मंदिराचा ऐतिहासिक वारसा जतन करताना भविष्यातील लाखो भाविकांसाठी सुरक्षित आणि सुबक व्यवस्था निर्माण करणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.